# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील ३१ वा रविवार – ०३ नोव्हेंबर २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः वंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांनी शेजार प्रीतीद्वारेच आपण देव प्रीतीकडे जाऊ शकतो ह्या सत्याची भाविकांना जाणीव करून द्यावी, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

२. आपल्या सर्व राजकीय नेत्यांनी व अधिका-यांनी निःस्वार्थीपणे देशाचा कारभार पाहात असताना सामान्य जनतेच्या अन्न, वस्त्र, निवारा व वैद्यकीय मदतीकडे अधिक लक्ष द्यावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

३. आजचे शुभवर्तमान देव प्रीती व शेजार प्रीतीवर प्रकाश टाकत आहे. आपल्याला मिळालेल्या ख्रिस्ताच्या अगाध प्रेमाद्वारे इतरांची सेवा करण्यास व त्यांच्यावर प्रेम करण्यास आपणास कृपा मिळावी, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

४. आपल्या धर्मग्रामातील सर्व कुटुंबात एकमेकांबद्दल नेहमी आदर, करूणा व काळजीची भावना असावी तसेच एकमेकांवर विनशर्त प्रेम करून आपण एकत्रपणे सहजीवन जगावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

५. सर्व आजारी व दुःखी कष्टी माणसांना प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेचा व प्रेमाचा स्पर्श व्हावा, आपल्या देशातील दंगलग्रस्त भागात तसेच जगात सर्वत्र शांती नांदावी, आपल्या राज्याच्या विधान सभेसाठी चांगले व कार्यक्षम उमेदवार निवडले जावेत तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे, **म्हणून आपण प्रार्थना करू या.**

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.